REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# ''सेवा क्षेत्रात महिलांना बचत गटाच्या माध्यमातुन संधी''

प्रा. वसंत गुरूशांत कोरे
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग संगमेश्वर कॉलेज, सोलापूर.

## प्रस्तावना : —

1999 नंतरच्च्रा काळात भारतीय विकास दर झपाटयाने वाढला त्यात सेवा क्षत्राची झालेली वाढ फार महत्वाची ठरली आहे. जेव्हा आपण दोन दशकापूर्वी आर्थिक उदारीकरणाची प्रक्रीया सुरू केली. यापुर्वी आपला मुख्य भर हा उत्पादन क्षेत्रावर होता परंतु उदारीकरणानंतर हेच चित्र बदलले गेले आणि सेवा क्षेत्राला प्रथमच प्राधान्य देण्यात आले. सेवा क्षेत्राने मागील दोन दशकात आपला विकास जरूर करून घेतला मात्र भविष्यात सेवा क्षेत्र विकासाचा हा वेग निश्चितच वाढणार आहे. गेल्या दोन दशकात उत्पादन क्षेत्र जास्त गतीने वाढल्याने दिसून येते. या उद्योगात एकतर पाच हजार रूपयांची नोकरी आहे किंवा थेट 50 हजार रूपयाची म्हणजे ज्याचाकडे कौशल्य नाही त्यांना मात्र अगदीच कमी पगारावर काम करावे लागते सध्याची ही नोकरीतील पगाराची दरी कमी झाल्यास जीवनमान सध्या तरी सेवा क्षेत्राचा वाढताप्रभाव आपल्या अर्थव्यवस्थेला मदत कारक ठरत आहे.

जगप्रसिध्द तत्ववेत्ता ॲरिस्टॉटल यांनी म्हटल्याप्रमाणे ''मान व समाजप्रिय प्राणी असुन समाजप्रियता कुटुंब धर्म, व्यवसाय, समुह यांच्याशी निगडीत असुन त्यांचा साह्याने मानवाला सुखी जीवन जगण्याची अंतःप्रेरणा मिळालेली असते. अतंप्रेरणेतुन मानव एकत्र येतो. समुहाने राहतो. सह—जीवनाची प्रेरणा व भावना निर्माण होतो. सहजीवननातुन समाजात सुसंस्कृतपणाचा विकास होत असतो म्हणजेच हा सुसंस्कृतपणामळेच महिलांचे गट जास्त होत आहेत. स्वयं—साहाय्यता समुहात सुसंस्कृत भावना असुन त्याव्दारे मानवाचे समुह, संघटन व समाजरचना मजबुत केली जात आहे. समुह हा मानवाची उपजत प्रेरणा असल्यामुळे तो समुहाने व्यवहार करून उन्नती करित आहे. त्यामुळे कल्याण साधण्यासाठी तो एक ध्येयाने व निष्ठेने संघटीत होतो. कारण तयाच्या मुळाशी स्वयंसहाय्यताची भावना आहे. या स्वयंसहाय्यता गटांना सामाजिकतेबरोबर आर्थिक घटकाची जोड दिलेली आहे. महिलांना सक्षम मानून त्यांना सबल स्वयं सहाय्यता बचत गटाव्दारे करता येते आणि समान दर्जा प्राप्त होऊ शकतो. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील महिलांना सजग व कार्यान्वित करण्यासाठी व त्यांना आर्थिक सामाजिक बळ देण्याकरिता व नारीशक्ती एका संघटनेत बांधण्याकरिता तसेच महिलांचा काटकसरवृत्ती, संचितवृत्ती, प्रामाणिकपण, नेतृत्व उद्योजकता या गुणांना बळकटी देण्याकरिता स्वयं—सहाय्यता महिला बचत गट हे तत्वज्ञान उपयुक्त ठरत आहे. तसेच ग्रामीण अर्थकारण व सामाजिक स्तर यामध्ये परिवर्तन होत असुन बलशाली समाज बनत आहे.



## ➢ बचत गटाची सुरूवात :—

महिलांचे सक्षमीकरणांचा विचार करीता असताना ज्या बचत गटाची आपल्याला सहज आठवण येते त्या बचत गटांची सुरवात झाली ती बांगला देशात. नोबेल पारितोषीकाने सन्मानिक झालेले प्रो. मोहमद युनुस हे एका अर्थी या संकल्पनेचे प्रवर्नक मानले जातात प्रो. मोहमद युनुस यांच्या प्रेरणेने ग्रामीण बॅकेचा उदय झाला इथे ग्रामीण या शब्दाचा बंगाली अर्थ काहीसा वेगळा आहे. ग्रामीण म्हणजे गाव आणि म्हणुनच ग्रामीण बॅक म्हणजे गावाची बॅक बांगलादेशातील जाबेरा गावाचा रहिवाशांनी या उच्च

विद्यानिभुवित माणसासमोर आपल्या दारिद्रयाचा प्रश्न मांडला या प्रश्नाला तुमच्या आधुनिक ज्ञानात काय उत्तर आहे. असे कळवुन विचारले ही परिस्थितती नाहीशी करायची तर गावकऱ्याची आर्थिक ताकद वाढली पाहिजे या जाणिवेतुन गाव पातळीवर बचत गटाची सुरूवात सुरूवात झाली. एरवी बुरख्यात असणाऱ्या महिलांनी मोठी हिरहिरी सहभाग दाखविली आणि पाहता—पाहता ग्रामीण बॅंक हा बांगला देशाचा अर्थव्यवस्थेचा कणा बनली.

भारतमध्ये स्वयंसाहय्यता गटाची चळवळ 'म्हैसुर रिसेंटलमेंट ॲन्ड डेव्हलपमेंट एजन्सी ( मायराडा) या संस्थेने 1985 मध्ये सुरू केली त्यांनी 'Credit Management Group' ( पतव्यवस्थापक गट) निर्माण केले मायराडाच्या माध्यमातुन स्वसंसाहय्यता गटाची निर्मिती होत असताना 1992 मध्ये Asia Pacific Rural and Agricultural Credit Association. च्या साह्याने भारतामध्ये स्वयं—साहय्यता बचत गट राबविण्यास सुरूवात झाली. त्यानंतर 1993 मध्ये रिझर्व बॅंकेने कायदेशिर मान्यता दिली. भारतामध्ये महाराष्ट्र, राजस्थान, तामिळनाडू, केरळ ही राज्ये स्वयंसाहय्यता गटाचा संदर्भात आघाडीवर आहेत. याचप्रमाणे मायराडा संस्थेचा निष्कर्षाची परिणीती म्हणुन पद्मश्री जया अरूणाचनाम यांनी नाबार्डच्या माध्यमातुन आंध्रप्रदेश, तामिळनाडू, अरूणाचल प्रदेश राज्यात बचत गट सुरू केले.

## ➢ स्वयंसाहय्यता बचत गट म्हणजे काय?

1. सर्वसाधारण 15 ते 20 लोकांचा महिलांचा अनौपचारिक समुह म्हणजे स्वयंसाहय्यता बचत गट.
2. निश्चित स्वरूपाने उध्दीष्टये घेऊन स्वइच्छेने एकत्र आलेल्या लोकांचा/महिलांचा समुह म्हणजे बचत गट.
3. एकाच कारणासाठी गटातील लोकांचा उन्नतीसाठी विकास व कायद्यासाठी एकत्रित आलेल्या लोकाचा समुह म्हणजे बचत गट होय.
4. प्रत्येक सभासद समान रक्कम, ठराविक कालावधीत बचत म्हणुन एकत्रीत करतात व त्याचा उपयोग सभासदाना आर्थिक गरजा भागविण्यासाठी करतात.
5. ही कोणतेही योजना अथवा प्रकल्प नुसन महिलांना व युवकांना संघटीत करण्यासाठी त्यांना विकासात्मक स्वरूपाचे शिक्षण देण्यासाठी महत्वाचे माध्यम आहे.

## ➢ शासनाचे योजना :—

1. ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील व्यक्तीच्या गटास ग्रामीण विभागाच्या ग्राम स्वयंरोजगार याजनेत प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व गट विकास अधिकारी यांचेकडून स्वयंरोजगारासाठी रू 10,000/— अनुदान दिले जाते व त्यावर बॅंकेकडून रू 15,000/— कर्ज असे एकूण रू 25,000/— खेळते भांडवल दिले जाते.
2. शहरी भागातील व्यक्तीचा बचत गटास आयुक्त तथा संचालक महानगरपालिका प्रशासन यांच्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेत उपायुक्त, महानगरपालिका व मुख्याधिकारी, नगरपालिका यांचेकडुन स्वयंरोजगारासाठी रू 1.25 लाख (50 टक्के ) अनुदान दिले जाते व उर्वरित 50 टक्के रक्कम रू 1.25 लाख राष्ट्रीयकृत बॅंक मार्फत कर्जरूपाने मिळते.
3. शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यास आयुक्त तथा संचालक, महानगरपालिका प्रशासन यांच्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेत उपायुक्त महानगरपालिका व मुख्याधिकारी नगरपालिका यांचेकडुन स्वयंरोजगारासाठी 15 टक्के परंतु कमाल रू 7500 इतके अनुदान शासनाकडुन दिले जाते हे अनुदान राष्ट्रीयकृत बॅंकेकडील जास्तीत जास्त कर्ज रू 50,000/— वर दिले जाते.
4. राष्ट्रीयकृत बॅंका गटाच्या बचतीच्या प्रमाणावर 1.2 ते 1.4 या प्रमाणात टप्पाटप्प्याने गटास कर्ज देतात.
5. सहकारी बॅंका बचत गटाच्या बचतीच्या प्रमाणात म्हणजेच 1.1 ते 1.4 या प्रमाणात व्यवसायासाठी कर्ज देतात.
6. स्टेट बॅंक ऑफ इंडिया बचत गटातील सदस्याला घरबांधणीसाठी व भुखंड खरेदीसाठी कर्ज देते.

## ➢ स्वयंसहाय्यता बचत गटाचे उद्देश :—

1. सावकारांच्या पाशात अडकावे लागु नये व बचतीची सवय लागावी हा बचत गट स्थापन करण्यामागचा प्राथमिक हेतू आहे.
2. सदस्यांनी दैनंदिन स्वरूपात काही बचत करायची आणि अडीअडणीला या एकत्रित बचतीतुन कर्ज घ्यायचे ही बचत गटाची मुळ संकल्पना.

3. बचत गटातील महिलांचे व युवकांचे मानसिक व वैचारिक परिवर्तन घडवुन आणुन त्यांना स्वबळावर उभे राहण्यास मदत करणे.
4. दारिद्रय रेषेखालील गरिब महिलांच्या विकासासाठी 10 किंवा त्यापेक्षा जास्त महिला एकत्र येऊन बचत गट स्थापन करून बचतीला प्रोत्साहन देणे व अडिअडचणींना छोटे कर्ज मिळवुन देणे.
5. सर्व महिला संघटीत करणे, त्यांना प्रशिक्षण देणे त्यांचा उत्पादनाचा दर्जा सुधारणा, त्यांच्या वस्तुसाठी बाजारपेठा निर्माण करून देणे.

## ➢ सेवा उद्योगात बचत गटाना संधी :—

महिला स्वयं—सहाय्यता बचत गटाला शेती संलग्न प्रक्रिया उद्योग, आणि सेवा उद्योग सुरू करून कमाईचे साधन मिळविता येते. गटाचा माध्यमातुन स्वयंरोजगार म्हणुन सेवा उद्योग सुरू करता येतील असे उद्योग शिवणकाम, दुग्धव्यवसाय, इव्हेंट मॅनेजमेंट, अन्न प्रक्रिया, बेकरी व्यवसाय, बुट व चप्पल बनविणे पिठाची चक्की, लॉन्ड्री, ब्युटीपार्लर, रेडीओ, मोबाईल दुरूस्ती, घड्याळ दुरूस्ती, मोटार रिवायंडीग दुरूस्ती, किराणा दुकान, भाजीपाला, विक्री केंद्र, वाचनालय, बुक बाईडिंग, नक्षीकाम, स्क्रीन प्रिंटीग फर्निचर, शालेय बॅगा, झेरॉक्स सेवा, मंगलकार्याकरिता भांडी, नर्सरी, मसाला कांडप, स्टेशनरी सेवा, उद्योग सुरू करून महिला स्वयंरोजगार निर्मिती करू शकतील.

स्वयंसहाय्यता गटांना शासकीय पातळीवर प्रयत्न करून स्वंयरोजगार बनविता येते. शासकीय पातळीवर महिलांना कमवते साधन दिल्यास महिला ही उद्योजक बनु शकेल. त्याकरिता शासनाने खालील कामे महिल बचत गटांना द्यावीत.

1. स्वस्त धान्य दुकाने व केरोसीन प्रभागनिहाय देण्यात यावे. शिवाय लोकसंख्यानिहाय वितरण करण्यात यावे.
2. शासकीय गॅस एजन्सी महिला बचत गटांना देण्यात यावी.
3. एस.टी. स्टॅन्ड मधील बुक स्टॉल गटांना देण्यात यावी.
4. दैनंदिन वर्तमानपत्राची एजन्सी गटांना देण्यात यावी.
5. ग्रामपंचायत पातळीवर 1 ते 50 लाख रूपयापयंतचे कंत्राटी काम गटाना देण्यात यावी.
6. विद्युत महामंडळाने विजबिल वितरण, रिडींग व विजबिल वसुली गटांना दिल्यास विजचोरी थांबुन वीजबील वसुली होऊ शकते.
7. रेल्वे खात्याने रेल्वे स्टेशनच्या हातगाडया व कॅटीन महिला बचत गटांना चालविण्यास द्यावे.
8. गावपातळीवर सर्वेक्षण करण्याचे काम प्राथमिक शिक्षकाऐवजी बचत गटांना दिल्यास गावाचे सर्वेक्षण तंतोतंत केले जाईल तसेच जनगणना मतदारयाद्या तयार करण्याचे काम देण्यात यावे.
9. शासकीय विभागातील उपाहरगृहे महिला बचत गटाना चालविण्यास देण्यात यावी.
10. शासनाने दृतगती मार्गावरील टोल नाकयावरील वसुलीचे काम महिला बचत गटांना दिल्यास भष्ट्राचार कमी होईल.
11. नगरपरिशदा आणि ग्रापंचायत यांच्या घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीचे काम प्रभागनिहाय स्वयं—सहाय्यता बचत गटांना वसुलीच्या प्रमाणात कमीशन तत्वावर देण्यात यावे.

वरील प्रमाणे शासनाने महिला बचत गटांना कामे दिल्यास खऱ्या अर्थाने महिलांना कमावते साधन मिळुन त्या उद्योजक बनु शकतील. त्यामुळे महिलांची आर्थिक उन्नती म्हणुन शासनाने याबाबत कठोर निर्णय घेऊन महिलांना कमावते साधन मिळवुन द्यावे.

## निष्कर्ष :—

आज जगामध्ये स्वयंसहाय्यता बचत गट ही योजना सर्वात मोठी समजली जात आहे. जगामध्ये इतर व्यवसायाच्या दृष्टीकोनातून स्वयंसहाय्यता बचत गट हे कर्ज वाटपाचे महत्वाचे कार्य करत आहे.

जगामध्ये मंदीचे सावट असतना सुध्दा स्वयंसहाय्यता बचत गटांना जास्त प्रमाणात कर्जवाटप होऊन त्याची वसुली पण होत आहे. अर्थव्यवस्थेत हे बचत गट शहरी व ग्रामीण भागात महत्वाची कामगिरी बजावत आहेत. ग्रामीण भागामध्ये दारिद्रय रेषेखालील राहाणाऱ्या लोकासांठी स्वयंसहाय्यता बचत गट महत्वाची भूमिका साकारत आहे. या योजनेमध्ये बचत म्हणुन एकत्र करून त्यांचा उपयोग सभासदांना आर्थिक गरज भागविण्यासाठी केला जातो. स्वयंसहाय्यता बचत गटामुळे सभासदाना पैशाची काटकसर कशी करावी याची सवय लागते. सावकाऱ्याचा कचाटयातुन बाहेर पडण्यासाठी स्वयंहाय्यता बचत गट फार उपयोगी ठरत आहे. बचत गटातील सभासदांना अतिषय अल्प दरात कर्ज पुरवठा केला जातो. स्वयंसहाय्यता बचत गटामुळे सभासदांना

समाजात एक महत्वाचे स्थान मिळते व महिलांना बचतीची समय लागते. त्यासाठी स्वयंसहाय्यक बचत गट हे देशातील नव्हे तर संपूर्ण जगात महत्व प्राप्त झाले आहे. यामुळे क्षेत्रात स्वयंसहायता बचत गट हे रोजगार निर्मितीचे साधन मानले जात आहे.

## संदर्भ सूची :–


1. अल्पबचत नियोजन ( बचतगट )
   प्रा. डॉ. एम्.यु. मुलाणी
   पहिली आवृत्ती डायमंड पब्लीकेषन्स् पुणे.
2. गरिबी मुक्त विश्वाची निर्मिती
   मोहमद युनुस
   कार्ल बेबर
   अनुवाद – गोविंद गोडबोले
   साकेत प्रकाशन, औरंगाबाद.